शासकीय विभागांना करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीतून विमानचालन संचालनालयास विमानाच्या सुट्टया भाग व वंगण इत्यादीच्या खरेदीसाठी सूट मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र.विचासं-१११८/प्र.क्र.७६/ २८-अ

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि.०३ मे, २०१८.

वाचा: १) दिनांक ६/४/२०१८ च्या मा.शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकी क्र.विचास-१११८/प्र.क्र.३५/२८-अ, दिनांक २३/४/२०१८ चे इतिवृत्त

२) उपसंचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई यांचे पत्र क्र. डीए/ एडीएम/४३६/२०१८, दि.२५/४/२०१८ चे पत्र

प्रस्तावना :

राज्याच्या अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवासाची संपूर्ण व्यवस्था विमानचालन संचालनालयाच्या आस्थापनेवरील वैमानिक व कर्मचारीवर्ग यांच्यामार्फत करण्यात येते. शासनाचे कार्यरत असलेले विमान सेसना सायटेशन ५६० एक्सएलएस या हवाई वाहनाची उत्पादक कंपनी अमेरिका येथे स्थित असून त्यासाठी लागणारे इंधन व सुट्टे भाग यांच्या खरेदीसंदर्भात तत्कालिन मुंबई शासनाच्या उद्योग व सहकार विभागाच्या शासन निर्णय क्र.SPO-१२५६-IND-II, दिनांक २५/९/१९५८ च्या अनुषंगाने विमानचालन संचालनालयामार्फत खरेदी करण्यात येत होती. आता सदर शासन निर्णय अधिक्रमित होऊन उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या सुधारीत दिनांक १/१२/२०१६ अन्वये प्रसिध्द केलेल्या नियमपुस्तिकेमध्ये खरेदीसंदर्भात स्पष्ट उल्लेख नसल्याने अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयामार्फत संचालनालयाने सादर केलेल्या देयकांसाठी आक्षेप काढण्यात येत आहेत.

मात्र, शासनाच्या हवाई वाहनांचे सुट्टे भाग/वंगण हे उत्पादक कंपनी/कंपनीचे अधिकृत विक्रेते यांच्याशिवाय दुसरीकडे कुठेही उपलब्ध होत नसल्याने त्यामध्ये ई-निविदेच्या प्रक्रियेचा अवलंब होणे शक्य होत नाही. त्यामुळे उद्योग,उर्जा व कामगार विभागाने घालून दिलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करणे शक्य नाही. यास्तव शासन स्तरावरुन हवाई वाहनाकरीता लागणा-या सुट्टे भाग/वंगण इत्यादीच्या खरेदीसाठी संचालक,विमानचालन यांना प्राधिकृत करण्यात येऊन त्यासंदर्भातील वित्तीय अधिकार प्रदान करण्याबाबतचा विमानचालन संचालनालयाच्या प्रस्तावास मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील विमानचालन क्षेत्राशी सबंधित शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ६ एप्रिल,२०१८ च्या बैठकीत मंजूरी प्राप्त झाली आहे.

<u>शासन निर्णय :</u>

उपरोक्त विवेचन लक्षात घेता उद्योग,उर्जा व कामगार विभागाच्या दिनांक १/१२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीतून विमानचालन संचालनालयास सूट देण्यात येत आहे. तद्नुसार शासनाच्या मालकीचे विमान व हेलिकॉप्टर साठी सुट्टे भाग,वंगण व अनुषंगिक संयंत्रे इत्यादीच्या खरेदीकरीता व सदर खरेदी उत्पादक कंपनीकडून अथवा भारतातील अधिकृत विक्रेत्यांकडून करण्यास संचालक,विमानचालन संचालनालय यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच याद्वारे संचालक, विमानचालन यांना विभागप्रमुख म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. त्या प्रित्यर्थचा खर्च क्र.ए-४, "२०७०-इतर प्रशासकीय सेवा (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण (००) (०२) शासनाचे विमानचालन विषयक सल्लागार" या लेखाशिर्षांतर्गत "५२, यंत्रसामग्री व साधनसामग्री" या उद्दिष्टाखाली सबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्प तरतूदीतून भागविण्यात यावा व त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. या संदर्भात उप संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून व संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरहू आदेश विमानचालन विभागाच्या विविध बाबींवर निर्णय घेण्यासाठी मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेल्या शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१८०५०३१५३८५४८६०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sandhya Ashok
Bageshwar

Digitally signed by Sandhya Ashok Bageshwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=4d4a8d57e69da6499480bc974f18dca56ad5541c4795df9434c3e826318ec8ea,
serialNumber=ba5a637883d7b445558182d1fd79c7e47a2d65e5094f71fb0ec8c5d23b0cc880, cn=Sandhya Ashok Bageshwar
Date: 2018.05.03 15:41:48 +05'30'

(सं.अ.बागेश्वर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत ,

१. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
२. महालेखापाल, (लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
६. निवडनस्ती